भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

GA 666548

अ.नं. 7409 दिनांक 29/3/2014

मुद्रांक शुल्क रू. ---- अक्षरी रू. ----

श्री मधुकर भागवतराव घोलप

राहणार जळगाव हस्ते श्री सुजित पाटील

राहणार " यांचे हस्ते मुद्रांक शुल्क

रूपये 100 होण्या करिता हा मुद्रांक दिला.

मधुकर कचरू फिरके
लॉ.स्टॅम्प वेंडर ला.नं. १०/२००१.
तहशिल आवार भुसावळ

कोषागार अधिकारी भुसावळ

19 OCT 2012

१

|| श्री ||

# आपसातील समजुतीचा करारनामा

सदरचा आपसातील समजूतीचा करारनामा आज **दिनांक ३० माहे मार्च, सन २०१४** रोजी जळगांव मुक्कामी लिहून ठेवला असे.

मे.प्राईम डेव्हलपर्स चे भागीदार
१. श्री. सुजित चुडामण पाटील उ.व.४३,
२. श्री. विजय बारसु किनगे उ.व.४३,
दोघांचा धंदा : व्यापार, ऑफिस : 'लता व्हीला', सुयोग कॉलनी, गिरणा टाकी रोड, एम.जे.कॉलेज मागे, जळगांव.
} लिहून घेणार

यांना

**श्री. मधुकर भगवंतराव घोलप**
उ.व.७४, धंदा : सेवानिवृत्त, राहणार :
१०१, लक्ष्मी निवास, जिल्हा पेठ,
जळगांव, तालुका व जिल्हा जळगांव.
} लिहून देणार

कारणे आपसातील समजुतीचा करारनामा लिहून देतो की, :

मिळकतीचे वर्णन :

तुकडी जिल्हा जळगांव, पोट तुकडी तालुका जळगांव, सब-रजिस्ट्रेशन ऑफिस जळगांव पैकी मौजे पिंप्राळा शिवारातील जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव यांचे हद्दीतील, (विभाग क्रमांक ८/२४८ मधील) :

**पिंप्राळा शेत गट नंबर १४५** पैकी **प्लॉट नं.९+१०/२** याचे **क्षेत्र ५०४.०० चौरस मीटर** आहे. यांस लांबी रूंदी पूर्व बाजू : ३२.०२ मीटर, पश्चिम बाजू : १८.२७ मीटर, उत्तर बाजू : २०.०० मीटर, दक्षिण बाजू : तिरकस आहे. यापैकी ;

**उत्तरेकडील भागाची प्लॉट जागा** क्षेत्र २७९.७१ चौ.मी. यांस लांबी रूंदी पूर्व बाजू : १३.९३५ मीटर, पश्चिम बाजू : १३.९३५ मीटर, उत्तर बाजू : २०.०० मीटर, दक्षिण बाजू : २०.०० मीटर आहे. यांस चतु:सिमा : पूर्वेस : प्लॉट नं.२, पश्चिमेस : ९.०० मीटर रूंदीचा रोड, उत्तरेस : प्लॉट नं.९+१०/१, दक्षिणेस : ह्याच प्लॉटातील तुम्ही लिहून घेणार यांचे मालकीची प्लॉट जागा.

सदरची प्लॉट जागा मी लिहून देणार यांचे मालकीची व कब्जे उपभोगातील असुन सदर प्लॉट जागे लगत तुम्ही लिहून घेणार यांचे मालकीची व कब्जे उपभोगातील आहे. तुम्ही लिहून घेणार हे बिल्डर्स व डेव्हलपर्स चा व्यवसाय करीत असतात म्हणून सदर माझे मालकीचे उपरोक्त प्लॉट जागेबाबत तुम्ही लिहून घेणार व मी लिहून देणार यांचेत आपसात बोलणी झाली व त्यानुसार सदर संपूर्ण क्षेत्राचे प्लॉट जागेवर तुम्ही लिहून घेणार यांनी एकत्रात फ्लॅट सिस्टीम इमारतीचे बांधकाम करण्याचे ठरविले व त्यानुसार माझे मालकीचे व कब्जे उपभोगातील प्लॉट जागा व त्यावरील नियमानुसार उपलब्ध होणारा चटई क्षेत्र निर्देशांक याप्रमाणेचे एकूणात मिळणारे बांधकाम क्षेत्रात तुम्ही लिहून घेणार यांचा सामाईकात ५०% व मी लिहून देणार यांचा सामाईकात ५०% हिस्सा याप्रमाणेची हिस्सेराशी ठरली व त्यानुसार सदर उपरोक्त प्लॉट जागेवर व त्यालगत असलेल्या तुमचे मालकीचे प्लॉट जागेवर याप्रमाणे प्लॉट नं.९+१०/२ चे प्लॉट जागेवर तुम्ही लिहून घेणार यांनी तुमचे स्वखर्चाने बांधकाम करावयाचे आहे असे आपण उभयतांमध्ये ठरलेले आहे व त्यानुसार आपण उभयतांमध्ये खालील नमुद केल्याप्रमाणेच्या अटी व शर्ती ठरल्या त्याचा तपशील;

०१. सदर माझे मालकीचे प्लॉट जागा क्षेत्र व त्यावर नियमानुसार मिळणारा चटई क्षेत्र निर्देशांक याप्रमाणेचे एकूणात क्षेत्रावर बांधकाम होणाऱ्या बांधीव क्षेत्रात मी लिहून देणार यांचा

सामाईकात ५०% हिस्सा व तुम्ही लिहून घेणार यांचा सामाईकात ५०% हिस्सा याप्रमाणे आपली हिस्से राशी राहावयाची आहे.

०२. सदर माझे मालकीचे प्लॉट जागेचे विकसन बाबत आवश्यक असलेली कागदपत्रे व दस्तऐवज तुम्ही लिहून घेणार व मी लिहून देणार यांनी आपसात सहमतीने नोंदणीकृत करून घ्यावयाचे आहे व त्यांस माझी केव्हाही मान्यता आहे व राहील.

०३. सदर उपरोक्त प्लॉट जागेवरील बांधकामासाठी लागणारा संपूर्ण खर्च तुम्ही लिहून घेणार यांनीच करावयाचा आहे. बांधकामासाठी लागणाऱ्या खर्चाची काही एक जबाबदारी मी लिहून देणार यांचेवर राहणार नाही.

०४. सदरचा आपसातील समजुतीचा करार तुम्ही लिहून घेणार व मी लिहून देणार यांचेवर तसेच आपण उभयतांचे वंश वाली वारस वगैरे यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

येणेप्रमाणे सदरचा आपसातील समजुतीचा करारनामा मी लिहून देणार यांनी राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजून, उमजून वाचुन घेऊन उभयसाक्षीदारांसमक्ष सह्या करून आज **दिनांक ३० माहे मार्च, सन** २०१४ रोजी जळगांव मुक्कामी लिहून दिला असे.

श्री. मधुकर भगवंतराव घोलप ____________

- लिहून देणार -

मे.प्राईम डेव्हलपर्स चे भागीदार

१. श्री. सुजित चुडामण पाटील ____________

२. श्री. विजय बारसु किनगे विजय बा० किनगे

- लिहून घेणार -

साक्षीदार

१. ____________ २. Patil

नांव : संदिप मधुकर घोलप नांव : सुरेखा सुजित पाटील